माझ्यावर खरंच मन बसलं आहे. पण आतां मला देवी-च्या दर्शनाला जायचं आहे. तुह्मी येता कां?

राधाबाई–बाईसाहेबांच्या सेवेला मी तयारच आहे.

लावण्यलतिका–चला तर.

(जातात पडदा पडतो.)

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

(स्थळ-विलासदुर्ग किल्यासमोरील फांशीं देण्याचें-स्थळ फांशींचे खांब वगैरे रोंवून सर्व व्यवस्था झाली आहे. वेळ —प्रातःकाळ—अधिकारी, शिपाई उभे आहेत जवळच हकीमसाहेब उभे असून फांशीं देणारा मांग फळीजवळ उभा आहे. गुलाबराव व सावळारामनिर्गूण या दोघांस फांशीं देण्यास मोठमोठ्या बेड्या घालून आणतात. हत्यारबंद शिपाई त्यांच्याभोंवतीं आहेत असें असतां पडदा उघडतो.)

अधिकारी—(एक हुकूम हातांत घेऊन त्या दोघांनां उद्देशून) ऐका तुह्मीं दोघांनीं खून केल्याचे शाबीत झाल्यावरून विलासपूरच्या राजेसाहेबांनीं तुह्मांस फांशीं देण्याचा आह्मांला हुकूम केला आहे. तर आतां त्यांनीं केलेला ठराव तुह्मांला बांचून दाखवितों. [हुकूम वांचतो.]

हुकूम—

विलासदुर्गचे राजेसाहेबांकडून—

तुरुंगावरचे अधिकारी यांस—असा हुकूम फरमाविण्यांत येत आहे कीं, गुलाबराव या इसमानें मुद्दाम अदावतीनें मालतीबाई नांवाच्या स्त्रीचा खून केल्याचें शाबीत झाल्यावरून त्यांस आजरोजीं फांशींची शिक्षा द्यावी—तसेंच सावळाराम निर्गूण याचें या कामांत अंग होतें असें शाबीत आहे. आणि सदर सावळारामानेंही पुष्कळ दरवडे घात-

त्याचें शाबीत झालें आहे. याकरतां त्यासही अत्तांच इथें फांशी देणें.—

मित्ती फाल्गुनी पौर्णिमा.

विलासदुर्गचे पराक्रमी राजे.

हं शिपाई चढवा यांनां, फांशींच्या फळीजवळ. [शिपाई, गुलाबराव, व सावळाराम निर्गुण यांस फळीवर चढवितात] तुह्मांला कांहीं खायची इच्छा असल्यास सांगा, तसंच कांहीं बोलायचं असेल तर बोला अगर देवाचं नाम स्मरण करा.

गुलाबराव—अरे शेंबड्या कारकुनड्या, मी जेव्हां खून केला तेव्हांच मला फांशीं होणार असं मी समजून आहे, असल्या मरणप्रसंगीं खायला पाहिजे कां? ह्मणून विचारायला तुला लाज वाटत नाहीं कां? अत्तां मला इतकंच बोलायचं आहे कीं, बाबांनों बायकांवर फारसा विश्वास ठेवूं नका, त्यांचा उपयोग फक्त कामवासनेंकरतांच करावा. पहा मी त्या माझ्या मालती नांवाच्या रंडीवर पूर्ण विश्वास ठेवल्यामुळं फसलों व तिचा रागाच्या आवेशांत खून केला. आणि त्यामुळंच मी फांशीं जात आहे, या खटल्याच्या मुळांशीं बड्याबड्यांचा संबंध आहे, पण मी त्यांचीं नांवं घेत नाहीं माझं बोलणं संपलं राम, राम, राम, राम. (भजन करतो.)

सावळाराम—अरे ए भिकार कारकुनड्या, माझा धंदाच दरवड्यांचा असल्यामुळं मी शेंकडों खून केले आहेत. पण या मालतीच्या खुनांत माझं अंग नव्हतं, मी फांशीं जात आहे याबद्दल मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. मला कांहीं बोलायचंही नाहीं. व देवाचंही नांव घ्यायचं नाहीं.

पण उत्तम दारू पिऊन मरावं असं मनांत आहे तर तेवढी दे.

अधिकारी—बरं तर, मरतांना रगड दारू पिऊन त्रे-ए शिपाई याला दारूचा शिसा दे. [शिपाई सावळारामास दारूचा शिसा देतो तो पिऊन मोठी ढेंकर देतो.] हं आतां वेळ नाहीं. मांगा, यांनां फांस घाल, व फळी पाड. [मांग दो-घांनांही फांस घालतो व फळी पाडतो. दोघेही कांहींवेळ धडपडतात व प्रेतें होतात.] झालं आमचं काम! हकीमसाहेब हीं दोन्हीं प्रेतं आपल्या घरीं घेऊन जाऊन. व यांचीं मुंडकीं प्रद-र्शनांत ठेवायला काढून घेऊन धड पुरायची व्यवस्था घेड लोकांकडून करवा कारण यांचीं प्रेतं न्यायला वारस कु-णींही नाहींत. धडं मात्र आजच्या आजच पुरलीं जावींत.

हकीमसाहेब—या व्यवस्थेबद्दल आपण बिलकुल का-ळजी करूं नये.

आधिकारी—आतां मी आपला निरोप घेतों.

हकीमसोहब—ठीक आहे. (अधिकारी शिपाई वगैरे जातात) कोण आहेरे मांग?

मांग—मी सरकार, जिव्यां!

हकीमसाहेब—ही प्रेतं घेऊन माझ्याबरोबर घरीं चल. [जातात नंतर हकीमसाहेबांचें घर दिसतें, तेथें हकीमसाहेब खुर्ची-वर बसले असतां मांग, गुलाबराव व सावळाराम दोघांचीं प्रेतें आणून ठेऊन जातात) आतां दोन्हीं प्रेतांचीं डोकीं कापून घेऊन धडं मांगांच्या स्वाधीन करावीं. म्हणजे सरकारी काम आटपलं. (सावळाराम निर्गुणचें डोकें कापून घेऊन धड फेंकतो) आतां फक्त या गुलाबरावाच्या प्रेताचं डोकं कापून प्रेतलं

ह्मणजे काम आटपलं. (गुलाबरावाच्या प्रेताजवळ सुरा घेऊन जातो. गुलाबराव हळू हळू डोळे उघडू मिटूं लागतो. हकीमसाहेब भिऊन सुरा टाकतो, पण पुन्हां नीट पाहिल्यावर धीर येऊन) अं: ! हें कांहीं पिशाच्च नाहीं. फांस बरोबर गळ्याला न बसल्यानं हा जिवंत राहिला आहे, तर अत्तांच पुन्हां याला न्याया-धिकाऱ्यांच्या ताब्यांत देऊन पुन्हां फांशीं देविवतों. (गुलाबराव डोळें उघडून हात पाय हलिवतो व तोंड उघडण्याचा प्रयत्न करून भीतीनें इकडं तिकडं पाहूं लागतो) च्छे ! आतां बिलकुल वेळ करून उपयोग नाहीं. अधिकाऱ्यांनां ताबडतोब वर्दी दिलीच पाहिजे. (जातो)

गुलाबराव—(उठून आश्चर्यानें इकड तिकड पहात कण्हत) अं—अं—अं—मी फांशींना गेलों होतों ? मग वाचलों कसा ? कां मी भूत आहे ? छे ! पण असं होईल कसं ? [गळ याला हात लावून पाहून] हा इथं फांसाचा वण तर पडला आ-हेच. पण हें घर कुणाचं असावं ? (इकड तिकड पहात) अरेच्या ! हें तर हकीमाचं घर दिसतं. पण मी वाचलों कसा ? मेलों होतोंना ? आश्चर्य ! अती आश्चर्य ! फारच अद्भुत प्रकार घडला हा ! आतां इथं एक घटकाभर जर वेळ गमावीन तर पुन्हां फांशीं जायचा प्रसंग येईल. कण्हत) पण मी पळावं कसं ? माझ्या पायांत शक्ती कुठ आहे ? तसंच मला आश्रय कोण देईल ? अरेरे ! काय माझ्यावर संकटाचा प्रसंग आला आहे. पण आतां आणखी जास्त वेळ गमावीन तर पुन्हां मरायची भीती आहे. तर स्वतःच नांव बदलून—कुठही लपून—अगर एखाद्याच्या इथं आश्रय करूनच जीव वांचवायचा प्रयत्न करावा. [हळूच

उठून शक्ती गेल्यामुळें हात पाय लटपटत असलेल्या स्थितींत पळून जातो. हकीमसाहेब, अधिकारी, शिपाई, येतात.]

अधिकारी–असं होईल कसं? आह्मीं तर त्याला फांशीं दिला. असं असून तो जिवंत झाला ह्मणतां?

हकीमसाहेब–खचीत, त्याला तुह्मीं लावलेला फांस बरोबर न लागल्यानं तो जगला.

अधिकारी–असं कधीं होणार नाहीं. आह्मीं त्याला बरोबर फांस लावला होता. तुह्मीं खोटं सांगता.

हकीमसाहेब–तुह्मीं खोटं सांगतां! तुमची सुस्ती!! फांशीं देण्यांत.

अधिकारी–तुह्मींच वेड्यासारखें भकतां! तुमची सुस्ती आहे प्रेताचं डोकं कापून घेण्यांत.

हकीमसाहेब–बस्स, तुमची सुस्ती आहे फांशी देण्यांत.

अधिकारी–गप्प बसा आतां! तो कुठ आहे तो दाखवा.

हकीमसाहेब–[इकड तिकड पहात.] अरेच्या! पळूनही गेला वाटतं.

अधिकारी–प्रेत पळून कसं जाईल? तुमचं डोकं बिघडलं वाटतं.

हकीमसाहेब–तुमचं टाळकं बिघडलं आहे. हें पहा; सावळाराम निर्गुणाचं प्रेत पडलं आहे. हें बरं इथून पळून गेलं नाहीं? कारण यांत जीवच नाहीं. आणि त्या गुलाबरावाचंच प्रेत नाहींसं कसं झालं? मी खाल्लं कीं काय? अहो अंमलदारसाहेब तो जिवंत झाला. मी स्वतः त्यानं डोळे उघडून मिटलेले पाहिले आहेत.

अधिकारी—खरंचकां ? तर मग त्याचा जारीनं तपास लावलाच पाहिजे. जवानांनों दवडा. दवडा त्या गुलाबरावाचां शोध करा. मी ही नाक्यावर येतोंच चला. (हकीमसाहेबावाचून सर्व जातात. व जांतांना सखळारामाचा मुडदा घेऊन जातात.)

हकीमसाहेब—असो, एक प्रकर्ण व्यवस्थेला लागलंच. आतां रोगी लोक यायची वेळ आहे तर, आपलं औषधाचं दुकान मांडावं. (औषधाचं मोठं दुकान मांडतो. रोगी लोक येऊन औषधें घेतात, हात दाखिवतात वगैरे, इतक्यांत सरदार खळोजीराव येतात. त्यास पाहून हकीमसाहेब त्यांचं फारच स्वांगत करतात. व बाकींच्या सर्व गिऱ्हाइकांस हाकून देतात.) आज आपला हा माझ्या गरिबावर केवढा अनुग्रह ! (हंसत) हः हः हः हः आपल्या सारख्या बड्या सरदार साहेबांचे पाय माझ्या घराला लागले, याचा मला किती तरी आनंद होत आहे.

खळोजीराव—तुह्मीं प्रख्यात वैद्य आहांत, तेव्हां तुमच्या भलेपणावर विश्वास ठेऊन, कांहीं गुप्त गोष्टीच्या संबंधानं मी तुमचा विचार घ्यायला आलों आहे. मी विचारणार ती गोष्ट फार महत्वाचीं असून नाजूक आहे. तसंच तिच्यां मुळं नेहमीं मला अत्यंत वाईट, मरणप्राय दुःख होतं.

हकीमसाहेब—आपण माझ्यावर निःशंक पणानं विश्वास ठेवा आपली गुप्त गोष्ट बाहेर फोडण्यांत काय फायदा? ती मी गुप्त राखली तरच माझं कांहीं तरी हीत होईल. तेव्हां आपण खुशालपणानं आपली हकीगत सांगा.

शिवाय आपण इथं कांहींही बोललों तरी बाहेर ऐकूं जाणार नाहीं. तुह्मीं विश्वासानं सांगितलेली गोष्ट माझ्या कडून बाहेर कधींही फुटणार नाहीं. असं मी वचन देतों. [तो त्याला वचन देतो.]

रवळोजीराव—तर मीं तुमच्यावर विश्वास ठेवून आपली गुप्त गोष्ट तुह्मांला कळवितों. पण जर ही तुह्मीं बाहेर प्रसिद्ध कराल तर मला जीवच देणं भाग येईल. (त्याला शंभर रुपये देऊन) हा पैसा गोष्ट न फोडण्याबद्दल घ्या-

हकीमसाहेब–(मोठ्या हवरेपणानें पैसे घेऊन) देवा शपथ कुठही फोडणार नाहीं.

रवळोजीराव—हे पहा, ती गोष्ट तुह्मांला कळवायला मला फार शरम वाटते, व दुःखही होतं! माझं लग्न होऊन आज बरीच वर्षं झालीं. माझी बायको फार सुरेख असून ती फार सुशील व सद्गुणी आहे. पण तिची कामवासना फार तीव्र असून—अरेरे देवा! आतां मी पुढचं कसं सांगू? [रडतो]

हकीमसाहेब—सरदारसाहेब, असं बायकांसारखं रडूं नका. सगळं सांगा तर खरं? मग उपाय निघतोकां पाहिन मी!

रवळोजीराव—हें पहा, मी जन्मापासून [हकीमसाहेबांचे कानांत कांहीं सांगून] असा, असा, आहे. बायको पाहिली कीं अंगावर शहारे येतात. यांतून जर तुह्मीं मला कांहीं दिव्यौषधी देऊन बरं करालं—तर दहा हजार रुपये तुह्मांला बक्षीस !

हकीमसाहेब—जरा तुह्मांला कांहीं विचारतो. [त्याच्या कानांत कांहीं विचारतो. तोही पुन्हां त्याच्या कानांत कांहीं सांगतो हकीमसाहेब निराश मुद्रा करतात.]

रवळोजीराव—मला काय जबरदस्त दुखणं आहे, तें तुह्मांला कळिवलंच. सांगा यावर तुमच्यापाशीं कांहीं औषध आहे कां ?

हकीमसाहेब—अगदीं जन्मापासून आजपर्यंत जर तुह्मीं (त्याच्या कानांत कांहीं सांगून) असें, —असें,—आहां. तर याच्यावर कोणतंही औषध दिलं, तरी गूण येणार नाहीं.

रवळोजीराव—तर मला या व्यथेवर कांहींच इलाज नाहीं अं !

हकीमसाहेब—कांहींच नाहीं. उगींच तुह्माला खोटी आशा दाखवून तुमच्याकडून पैसे उपटणं, ह्मणजे चोरीच करणं होय.

रवळोजीराव—अरेरे! आतां मात्र जगांत उपाय नाहीं. बरं मी जातों. पण मी सांगितलेलं कुठं बोलूं नका बरं !

हकीमसाहेब—कधींही मान कापली तरी आपलं व्यंग फोडणार नाहीं. (जातात पडदा पडतो.)

अंक ४ था.

प्रवेश २ रा.

(**स्थळ**—सरदार रवळोजीरावांचा भव्य—दिवाणखाना—दिवाणखान्यांत रोषनाई झालेली आहे. वेळ—रात्र—एका मोठ्या खुर्चीवर सरदार रवळोजीराव बसले असून उजव्या हाताजवळ आदबीनें गुलाबराव उभा असतां पडदा उघडतो)

र वळोजीराव—कालच्या पेक्षां आज तुमची तब्येत इतकी सुधरलेली पाहून मला फार आनंद झाला आहे. मोती शेटजी आतां माझी इतकीच इच्छा आहे कीं तुमची प्रकृती अगदीं बरी होऊन तुह्मांला चांगली शक्ती येई-पर्यंत तुह्मीं माझ्या इथंच रहा. मोतीशेट, काल तुह्मीं सांगितलेलीं सर्व हकीगत ऐकल्यापासून—माझा तुमच्यावर विश्वास बसत आहे. आतां तुमच्या चोरीला गेलेल्या जिनसा परत मिळण्याची तुह्मीं आशा देखील करूं नका.

गुलाबराव—काय? आशा करूं नको! देवा! मग माझं कसं होईल? अरेरे! माझी सगळी पुंजी गेली हो! आतां मी कसं करूं? जाऊं कुठं? (रडूं लागतो.)

र वळोजीराव—मोतीशेट, तुह्मीं शांत व्हां या परदेशांत तुह्मीं एकटे असल्यानं या वाड्यांतून बाहेर पडायच्या वेळीं तुमच्याजवळ दमडी ही नाहीं व तुह्मांला कुणी मित्र नाहीं असं घडणार नाहीं. आतां मी तुह्मांला निराश्रित राहूं देणार नाहीं. तुमच्या हिताकरतां माझा पैसा व वजन या दोहोंचा ही मी उपयोग करीन.

गुलाबराव—महाराजांचे हे माझ्यावर अत्यंत उपकार आहेत.

र वळोजीराव—मोतीशेट, तुमच्या कल्याणाचा एखादा उपाय माझ्या हातून निघेपर्यंत या वाड्यांतून तुह्मांला जाऊं द्यायचं नाहीं. असा माझा निश्चय आहे. मी तुह्मांला दाखवून ठेवलेल्या खोलींत तुह्मीं एकटेच बसत जा. कारण तुह्मांला मंडळींत बसायची संवय नाहीं.

गुलाबराव—हो, अजून मी थोडा अजारी असल्यानं असं झालं आहे खरं!

र बळोजीराव—बरं तर जा आतां स्वस्थ झोंप घ्या [विचारांत निमग्न होतो]

गुलाबराव—[आत्मगत] मी मोतीशेटाचं घेतलेलं सोंग इथपर्यंत खूप साधलं! आतां पुढं हळू हळू या बड्या सरदाराच्या टाळक्यावरून हात कसा फिरवायचा या विचाराला लागलं पाहिजे. [जातो]

र बळोजीराव—[दुःखानें आत्मगत] कसं करावं? माझं व्यंग गुप्त कसं राहील? (विचार करीत) बस्स दुसरी तोड नाहीं. एक तर आत्मघात केला पाहिजे—नाहींतर ती दुसरी भयंकर युक्ती योजिलीच पाहिजे. असं जर कांहीं न झालं, तर माझी बायको बिघडणार! व माझं बेंड बाहेर फुटणार! बस्स! ठरला निश्चय! आत्मघाताशिवाय तोड नाहीं. [एक पिस्तुल काढून तें आपल्या उराजवळ धरतो. पण पुन्हां भीतीनं ते खाली टाकून] पण असा जर मीं एकदम जीव दिला तर सगळ्या लोकांनां माझ्या बायकोबद्दल शंका येऊन त्यांत तिचा व माझा दुर्लौकिक होईल. तसंच, तो हकीम माझी एकुणएक हकीगत प्रसिद्ध करील. आणि असं झालं असतां माझी फटफजिती होऊन माझ्या मोठ्या संपत्तीपैकीं एक पै ही माझ्या बायकोला मिळणार नाहीं. तेव्हां जीव देणं वेडेपणाचंच काम आहे. [विचारांत चूर होतो]—तीच—तीच—[दुःखानं] तीच व्यवस्था केली पाहिजे अरेरे! देवा! शेवटीं माझ्या बायकोची कामशांती माझ्यानं पुरी होत नाहीं, ह्मणून दुसरा मनुष्य आणायचा घोर प्रसंग माझ्यावर यावानां? मर्जी तुझी! पण अत्तांच राजपुत्राची स्वारी माझ्या अमंत्रणावरून इथं येणार आहे. (एक हुजऱ्या येतो) कायरे?

हुजऱ्या—महाराज, राजपुत्राची स्वारी आली.

रवळोजीराव—त्यांच्या स्वागताला मी इथं तयारच आहे. (उठतो) तूं जाऊन तिला इकड लावून दे. जाजा— (हुजऱ्या जातो. राजपुत्र येतो त्याला सामोरा जाऊन रवळोजीराव त्यास मुख्यस्थानीं आदबीनें आणून बशिवतो) माझ्या आमंत्रणाला सरकारानीं मान दिला हा माझ्यावर अनुग्रहच झाला.

राजपुत्र—आपल्यासारख्या थोर सरदारांच्या शब्दाला आह्मीं मान दिलाच पाहिजे. (लावण्यलतिका येते तिच्याकडे पाहून.) बाई आपण खुशाल आहांनां ?

लावण्यलतिका—सरकारची आमच्यावर मर्जी असली ह्मणजे आह्मीं खुशालच असतों. (रवळोजीराव दोघांकडे चोरून पहातो व लक्ष दुसरीकडे आहे असें दाखवितो.)

राजपुत्र—(तिच्याकडे कामोत्कंठेनें पाहून) आहहा ! आज तुह्मीं फारच मारू दिसतां. असलं मोहक स्वरूप पाहून—विश्वामित्र ही खुळा होईल. (तिला डोळा मारतो.)

लावण्यलतिका—[त्याच्याकडे कामानें धुंद होऊन नखऱ्यानें पहात असतां] उगीच मेली माझी कांहींतरी स्तुती करतां झालं ! पण थोडं अटीव दूध प्यायला आणू कां ?

राजपुत्र—अंहं ! नको.

लावण्यलतिका—बरं थोडं श्रीखंड तरीं ?

राजपुत्र—खरंच नको ! (हंसतो)

लावण्यलतिका—बासुंदी, पुरी, कांहींतरी मेलं खाल्लंच पाहिजे.

राजपुत्र—मी परका कां आहे ? माझं पोट भरलं आहे. नाहींतर तुमच्या आग्रहाची जरूरच नव्हती. मागून घेतलं असतं.

लावण्यलतिका—नाहीं, पण माझ्याकरतां थोड्या साखर पाऱ्याच्या वड्या खाल्यांच पाहिजेत. [त्याला आ-ग्रहाची खूण करते]

राजपुत्र—[तिला खुणावत असतां] तुमच्याच आग्रहा-खातर खातों. [दोघेंही एकमेकांस नेत्रकटाक्ष मारतात खुणा क-रतात. खळोजीराव चोरून दोघांकडे पहात.]

खळोजीराव—(आत्मगत) खास! या माझ्या बाय-कोचं व राजपुत्राचं सूत जमणार. (उघड) अग, सरका-रांनां उत्तम साखरपाऱ्याच्या वड्या दे आणून. (लावण्यल-तिका राजपुत्राकडे पहात जाते.) आज मुद्दाम सरकारांनां माझ्या इथं यायची तसदी द्यायचं कारण मला थोडी विनंती करायची आहे.

राजपुत्र—हं हं! काय आहे तें सांगा?

खळोजीराव—वीस हजार रुपयांची ठेव आपल्याज-वळ ठेवायचा माझा बेत आहे.

राजपुत्र—कांहीं हरकत नाहीं. आपले पैसे सुरक्षित रहा-तील. मी तुमचं ह्मणणं आनंदानं कबूल करतों. पण माझ्या प्रियकर मित्रा, तुझ्यासारखा भाग्यशाली या साऱ्या जगांत दुसरा कुणीही नसेल. या लावण्यवतीच्या तोडीची सुंदर व सुशील बायको सापडणंच कठीण.

खळोजीराव—हो, ती मोहक आहे खरी! पण तें जाऊंदे. पण सरकार आपण आपलं काम संपवूं. अत्तांच मी वीस हजार रुपये आपल्या जामदाराकड मोजून द्याय-ला जातों.

राजपुत्र—तुह्मीं केवळ स्नेह भावानंच ही गोष्ट करीत आहां. पण आपली बायको किती तरी सुंदर व पाणीदार!

रवळोजीराव—तें खरं ! पण मी अत्तांच रुपये तिकुंड मोजून पाठवायला जातों. ह्मणजे एक मोठ्ठं काम संपलं !

राजपुत्र—बसा, मग गेलात तरी हरकत नाहीं. मला रुपयांची कांहीं फार ओढ नाहीं. पण खचीत तुमच्या स्त्री-सारखं सौंदर्य मी जगांत पाहिलं नाहीं, ती कितीतरी मर्यादशील.

रवळोजीराव—तें खरंच ! पण मी अधीं अत्तां सांगितलेलं काम करतों. (जातो, व लावण्यलतिका साखर पाऱ्याच्या वाड्या घेऊन येते राजपुत्र जवळ कोणी नाहींसं पाहून तिला मिठी मारतो व चुंबन घेतो.)

राजपुत्र—हे अप्सरे, मला सार्वकाल तुझा ध्यास लागला आहे.

लावण्यालतिका—आणि प्रिया मला ही पण आपला लागला आहे. (त्याच्या गळ्यांत हात घालून) पण आतां या मधुर साखरपाऱ्याच्या वड्या नाहींकां खायच्या ?

राजपुत्र—तुझ्या गोड हातांनीं माझ्या तोंडात पडल्यावर त्या कां, नाहीं मी खाणार ?

लावण्यलतिका—(त्याच्या तोंडांत वड्या घालते, तो खातो आतां तर मना सारखं झालंना ?

राजपुत्र—(तिच्या तोंडांत वड्या घालून)' तूंही पण खाच ! त्या शिवाय मला एकट्याला या घशाखालीं कशा उतरतील ? (ती खाते) आतां तुझ्या रंगमहालाचा मला लाभ झाला पाहिजे.

लावण्यलतिका—(लाडके पणानें) तर मग आपण माझा घात करायचा पुरता निश्चयच केला आहेनां ?

राजपुत्र—तुझा घात ? अहाहा! माझ्या अप्सरे, तुला सुख लागण्यासाठीं, माझा प्राणही द्यायला मी सिद्ध आहे. तुझ्या प्रीतीनं मी निव्वळ वेडा झालों आहे. मला रात्रंदिवस तुझा ध्यास लागला आहे. आतां मात्र माझी निराशा करूं नको. (तिचें चुंबन घऊन) हं, सांग आतां कशी व्यवस्था करायची ?

लावण्यलतिका—(त्याच्या कानांत कांहीं सांगून) प्रिया हें असं असं करायचं.

राजपुत्र—जिवलगे, पण लवकरच दार उवड बरं ? मी जातों. (तिचे चुंबन घेऊन जातो. ती—तो जातो त्याच्याकडे बराचवेळ निरखून पहात विचार करीत असतां कांहीं सुचल्या सारखं करून दाराला कडी लावून परत येते.]

लावण्यलतिका—(आत्मगत) देवा, नवऱ्याचं सुख नसल्यामुळं मी कामव्यथेनं व्याकूल झालें आहे, तरी असल्या जिच्या तिच्या पुढं लाळ घोटणाऱ्या राजपुत्राला वश व्हावसं मला वाटत नाहीं. प्रथम त्याचं सौंदर्य. बोलण्याची छाप, उभं रहाण्याची अक्कड यांकड पाहून मी फसलें. देवा दया कर, मला अशी दुष्टबुद्धी देऊं नको. (पडद्यांत दारावर थाप ऐकूं येते, ही कान देऊन ऐकते.) हं, तोच चोंबडा आला असावा. (पुन्हां चार पांच थापा ऐकू येऊन नंतर पुढील शब्द ऐकूं येतात.) " जिवलगे मी तुझा प्रियतम राजपुत्र आहे कडी काढ "

(**राजपुत्र**—आंतून मी राजपुत्र कडी काढ.)

लावण्यलतिका—जा मेल्या इथून चालता हो. [राजपुत्र आंतून—असं काय] काय मेला माझ्याभोंवती उपद्व्याप

हा! आतां गच्चीवर जाऊन पडतें, ह्मणजे तरी अंगाची आग कमी होईल. (जाते व छपत छपत खळोजीराव प्रवेश करतो)

खळोजीराव—मी इतकी खटपट केली असून अजून माझी बायको शुद्ध आहे. (दुःखानें) अरेरे! कायतरी माझी स्थिती! देवा! मला जन्मतःहाच असा बनविलास अं! असा मी तुझा काय अपराध केला होता. आतां मी काय करावं? च्छे! कांहीं सुचेनासं झालं आहे.

[जातात पडदा पडतो.]

अंक ४ था.

प्रवेश २ रा.

(**स्थळ**—पूर्वीचीच—वेळ—रात्र—गुलाबराव उर्फ मोतीशेट विचार करीत फिरत असतां पडदा उघडतो.)

गुलाबराव—(आत्मगत) काय अघटित प्रकार घडताहेत. मी घोर अपराधांबद्दल फांशीं गेलों, पण निव्वळ दैवयोगानचं जगलों. व या बड्या सरदाराच्या रम्य मंदिरांतही आश्रय मिळाला. मी घेतलेलं मोतीशेटाचं सोंग ही खूपच साधलं आहे आज चार दिवस झाले मला इथं येऊन. इतक्यां वेळांत बस्तान तर खूप बसलं आहे. तब्बेत नीट नसल्याची सबब सांगून, बाहेरच्या मंडळीनां मी आपलं तोंडहीं दाखिवलं नाहीं. तूर्त या सरदाराच्या इथं पंक्तीचा पुरुवा तर झोडतोंच आहे. पुढं कसा काय रंग जमतो तें पाहूं? कसं कसं बरं! या सरदाराच्या बायकोला मी नापसंत नाहीं. ती मोठी उच्छंखल आहेच. तसंच ती व तिचा नवरा एका खोलींत निजत नाहींत. पण असं कां असावं, याचा मात्र उलगडा होत नाहीं. एकदां

वाटतं,-ती आपल्या नवऱ्याशीं खरेपणानं वागत नसावी, व ही गोष्ट त्याच्या नजरेला आल्यामुळं, त्यानं तिचा त्याग केला असावा, अगर एकदां असं वाटतं,-त्याच्याच-पाशीं कांहीं नसावं, इथंच सारा गोंधळ आहे. अहाहा! पणती किती तरी सुंदर आहे, असल्या तारुण्याच्या बहा-रींत आलेल्या, व मदनान मुसमुसलेल्या, स्त्रीशीं माझा संग घडेल,-तरच मी जन्माला आल्याचं व मरणांतून वाच-ल्याचं सार्थक! (दचकून पडद्याकडे पाहून) अरे वाः पण तीच इकडं येत आहे. इच्या सुंदर गालांवर कामज्वराची चांगलीच लाली चढली आहे. पाहूं आतां कांहीं लग्गा लागतो कां! (ती येते व कामानें संतप्त होऊन याच्याकडे प्रेम दृष्टीनें पहाते व लवून मुजरा करूनहंसत) आज हवा स्वच्छ असल्याची संधी आपण वांयाजाऊं दिलीं नाहीं.

लावण्यलतिका-(हंसत) पण आज छानदार ऊन पडलं असतां, तुह्मीं कां नाहीं थोडे बाहेर गेलां? मोती शेटजी, जरा स्वच्छ हवा घेतली असती तर तुह्मांला बरं वाटलं असतं!

गुलाबराव-तुमचा शेवटचा निरोप घेईपर्यंत या वाड्याचा उंबरठा ओलांडू नयेसं वाटतं! आणि माझंचमत ह्मणाल तर असलं अदरातिथ्य सोडून जायची घाई करावसं माझ्या मनांत नाहीं. (दुःखाचें सोंग करून) अरेरे! पण कांहीं चमत्कारिक गोष्टी घडत आहेत! (आपल्या तोंडांत ~~मारून~~ घेऊन) पण च्छे! किती वेडा मीं! मूर्ख मी!

लावण्यलतिका-अगबाई, पण तुह्मांला असा त्रास होण्यासारखं काय झालं आहे? असं काय बरं मेलं वेड्या-सारखं करावं? तुह्मीं इथंच राहावं अशी त्यांची इच्छा आहे.

गुलाबराव-ते खरं! पण देवा! मी या राजधानींत

आलों नसतो तरी बरं झालं असतं! (दुःखानें डोळे पुसतो)

लावण्यलतिका—(त्याच्याकडे पहात) तुमची अशी स्थिती पाहून मला फार दुःख वाटतं. तुह्मीं या गावांत अगदीं परके आहां. इथं तुह्मांला कुणी स्नेही ना मित्र ! तेव्हां मी मोकळ्या मनानं विचारतें,–तुह्मांला असं दुःख व्हायचं काय अंतस्थ कारण आहे तें सांगा ?

गुलाबराव—(तिच्याकडे प्रेमानं पहात टक लावून) तुमच्या तोंडचा प्रत्येक शब्द माझं दुःख जास्तच वाढवीत आहे, आपण मला इथून जायची परवानगी द्या. नाहींतर माझ्या तोंडातून कांहीं भलभलते शब्द निघतील. आणि त्यांचा तुह्माला संताप येऊन, माझी निराशा झाली कीं, मला प्राणत्यागाशिवाय दुसरी सोयच नाहीं. (झपाट्यानें आंत जाऊं लागतो.]

लावण्यलतिका–[त्याचा हात धरून) थांबा, थांबा, मोतिशेट, मी तुह्मांला सांगतें,–हें तुमचं करणं कितीतरी चमत्कारिक दिसतं! मीं तुमच्याशीं मित्रत्वानं वागत असतां,–तुह्मीं पळून जाता, हें कांहीं तुह्मांला शोभत नाहीं.

गुलाबराव–(तिच्याजवळ जाऊन) तुह्मीं जी आज्ञा कराल; ती मी ऐकायला सिद्ध आहे. फार तर काय ? तुह्मीं मला प्राणही द्यायला सांगितलं तरी तो मीं देईन. पण एक मात्र! तुह्मांला पाहिलं,–ह्मणजे माझं मलाच भान रहात नाहीं.

लावण्यलतिका–(कामानें धुंद होऊन लाजत) अग बाई, तुह्मीं ह्मणता तरी काय हें ? मीं अगदीं गोंधळलें आहें.

गुलाबराव–तिच्याजवळ खेटून उभा राहून व कामानं धुंद

होऊन पहात). मी काय ह्मणतो याचा अर्थ तुह्मांला सांगूं ह्मणतां? बरं आहे सांगतों. माझ्यावर विलक्षण संकट कोसळून मीं तुमच्या वाड्यांत आलों. आणि तुमच्या पतीनं व तुह्मीं माझ्यावर थोर उपकार केले! याबद्दल मी तुमचा जन्मभर बंदा गुलाम आहे. पण काय सांगूं? तुमच्याविषयीं माझ्या मनांत वसणाऱ्या कृतज्ञबुद्धीचं कांहीं चमत्कारिक रूपांतर झालं आहे. या माझ्या विकाराची तऱ्हा कांहीं अनिर्वचनिय आहे. स्वर्गांतल्या सुखांचा आणि अग्निकुंडांतल्या यातनांचा अनुभव, या विकारामुळं मला एकाच वेळीं येतो. मी आनंदसागरांत बुडून जातों आणि त्याचवेळीं परमावधीचं दुःखही भोगीत असतों. अहाहा! काय तरी तुमचं सौंदर्य! तुह्मीं मला गंधर्वलोकच्याच भासता. तुमचा मधुर स्वर, सर्वोत्कृष्ट आणि मंजुल अशा वाद्यांच्या आवाजाप्रमाणं आहे. तुमच्याकड माझी सारखी टक लागली आहे. वरचेवर मला वाटतं,–तुमच्या पायां पडावं, व लगेच तुमच्या अधराचं यथेच्छ पान करावं. सुंदरी, याप्रमाणं माझ्या मनाची स्थित्ती झाली आहे. तुमच्या संबंधानं असे विचार मी आपल्या मनांत येऊं द्यावे, हे महत्पाप आहे. पण काय करूं? माझं मन आवरत नाहीं. हिमाचलावरील धबधबेही कुणी आवरून धरतील,–पण हे ~~असे~~ विचार माझ्यानं खास आवरत नाहींत. तेव्हां माझी आपल्याला अत्यंत नम्रपणानं इतकीच प्रार्थना आहे, आपण मला इथून जाऊं द्या. अशी माझ्या मनाला मोह घालणारी लावण्यलतिका, ज्या शहरांत आहे, तिथं एक पळभरही राहूं नये असा मी निश्चय केला आहे. बस्स

इथून गेलंच पाहिजे. त्याशिवाय सोय नाहीं. (जाऊं लागतो ती त्याचा हात धरून त्याला उभा करते.]

लावण्यलतिका–अहो पण असं करूं नका. थांबा, जाऊं नका. माझीचं तुह्मांला शपथ आहे.

गुलाबराव–(परत तिच्याजवळ येऊन) काय ? तुह्मीं मला परत यायला सांगतां ? अहाहा ! तर मग खास तुह्मीं माझ्यावर रागांवला नाहीं. पण आतां मी इथं कां राहावं?

लावण्यलतिका–(प्रेमानें त्याच्याकडे पहात) मी सांगतें ह्मणून रहा–प्रियकरा, इथं राहून माझ्यावर प्रीती करा, आणि ती माझ्याकडून आपणावर करून घ्या, खचीत ! माझं मन तुमच्यावर बसलं आहे.

गुलाबराव–(तिला आलिंगन देऊन व चुंबन घेऊन) माझ्या प्रियकरणी, कितीतरी माझ्यावर हें तुझे उपकार आहेत ह्मणून सांगू आत्तां मात्र माझ्या आशा सफल झाल्या.

लावण्यलतिका–(त्याच्या गळ्यां हात घालून) प्रियकरा, प्रेम हें काय आहे, हें तरी मला अत्तांच कळलं. माझ्या नवऱ्यावर माझं प्रेम नाहीं याचं कारण तुह्मीं समजलांत कां ?

गुलाबराव–नाहीं बोवा.

लावण्यलतिका–(त्याच्या कानांत हंसत हंसत कांहीं सांगून) तें असे असे आहेत ! ह्मणून मला सुख नाहीं !

गुलाबराव–(हंसत) हं ! हं ! एकूण हें असं आहे अं ! (तिला प्रेमानं आंवळींत) माझ्या लाडके,–माझ्या परम पूज्य देवते, मला या तुझ्या प्रीतीचा पूर्ण ठेवा, अत्तांच तुझ्या महालांत मिळाला पाहिजे.

लावण्यलतिका–(लाडकेपणानें) पण माझ्याकडून कुठं ना आहे.

गुलाबराव–(मदनानं वेडा झाऊने) चल तर.

अंक ४ था.

प्रवेश ४ था.

(स्थळ—पूर्वींचेचं—वेळ—प्रातःकाळ—सरदार रवळोजीराव व हकीमसाहेब प्रवेश करतात पडदा उघडतो.)

रवळोजीराव—कसं कसं ह्मणतां? गुलाबराव नांवाचा इसम फांशीं दिला असून,—तुह्मीं जिवंत झालेला पाहिला! अगदीं झूट सांगता.

हकीमसाहेब—महाराज, प्रत्यक्ष या डोळ्यांनीं त्याला जिवंत होतांना पाहिला.

रवळोजीराव—मोठाच चमत्कार सांगतां तुह्मीं!

हकीमसाहेब—महाराज, त्यांत चमत्कार कांहींच नाहीं फांस बरोबर न बसल्यामुळं तो जगला. नाहींतर त्याचा सावळाराम नांवाच्या दोस्ताप्रमाणंच त्याची स्थिती झाली असती पण सरकार या पहा [पडद्याकडे पाहून] बाईसाहेब आल्याच. [लावण्यलतिका येते तिच्याकडे पाहून मुजरा करून) सरकार यानांचना पौष्टीक औषधं सुरू करायचीं आहेत. माझ्यापाशीं—[दचकून आश्चर्यानें पडद्याकडे पहातां इतक्यांत गुलाबराव येतो व हकीमाला पाहून भीतीनें कापूं लागतो] अरे? हे मीं काय पहात आहे! हा मनुष्य का संमंध?

रवळोजीराव—[आश्चर्यानें दोघांकडे पहात] ह्मणजे? याचा अर्थ काय?

हकीमसाहेब—अर्थ कसला विचारतां? महाराज, हाच तो फांशीं दिला असून जगलेला गुलाबराव! —

लावण्यलतिका—[एकदम भीतीनें दचकून] अगबाई, असं तुह्मीं काय बडबडता? (गुलाबरावाकडे पाहून) तुह्मीं मोतीशेट ना? [गुलाबराव मान खालीं करतो]

हकीमसाहेब—बाईसाहेब, तो मोतीशेट नाहीं. गुलाबराव

आहे. या खुनी मनुष्याला मी अत्तांच धरतों पहा. (गुलाबरावाला पकडून धक्के देतो.)

खलोजीराव–(रागानें) अरे! विश्वास घातक्या! बेरडा! मला ठकवलसं काय ? काय घोर प्रसंग हा!

लावण्यलतिका–(मनाला धक्का बसून) हाय हाय फसलेग बाई मी! (किंकाळी मारून जमीनीवर बेशुद्ध पडते हकीमसाहेब व खलोंजीराव तिला सांवरतात.]

खलोजीराव–अग, सावध हो, सावध हो, च्छे, ही तर बेशुद्ध झाली. हकीमसाहेब इला चांगला उपचार करून सावध करा बरं कां ? (हकीमसाहेब तिला सावध करू लागतात. खलोजीराव, गुलाबरावाच्या मानेला हिसका देऊन] बेरडा! तुला इथच ठार केला असता. पण त्यांत माझी गुप्त गोष्ट बाहेर पडून–जिकड तिकड माझी बेअब्रू–दुर्लौकिक–थट्टा व उपहास होईल ह्मणून तुला वाचवितों. अरेरे! देवा! केवढं तरी माझं दुर्दैव! आणि या माझ्या बायकोचंही नशीब किती खोटं! हाय हाय! जो मनुष्य थडग्यांत गार–मढं होऊन पडला आहे असं सगळ्या जगाला वाटत होतं! तोच ना हा उभा आहे! (दांत ओंठ खातो.)

गुलाबराव–(भीतीनें कांपत) महाराज, माझ्यावर दया करा, मला वांचवा.

खलोजीराव–घातक्या, तुला वाचवीन, पण दया मात्र करणार नाहीं. प्रथमच जर तूं पायांपडून मला आपलं खरं नांव व हकीगत सांगतास तर मीं तुझ्यांवर कदाचित् दयाही केली असती. पण अधमाधमा, तूं खोटा बहाणाकरून मला फाशिवलंस. माझ्या बायकोलांही फसवून ज्याच्या गळ्याभोंवती मांगानं फांस घातला होता, असा तुझ्याशीं इचं कुकर्म तूं घडिवलंस, आणि माझ्या तोंडाला काळोखी लावलीस! असा तूं पाजी आहेस. (त्याच्या तोंडांत मारतो.]

गुलाबराव—(रडत) क्षमा, क्षमा, क्ष—

रवळोजीराव—अरे सात पाजी. तूं अत्तांच या राजधानींतून परदेशाला चालता हों. नाहींतर तूं जिवंत असल्याची वर्दी सरकारांत देऊन तुला हजर करतों. मग मर खुशाल !

गुलाबराव—एकघटकाभर सुद्धां मी या राज्यांत राहत नाहीं. पण मला पुन्हां फांशीं देववूं नका. पायां पडतो तुमच्या—(त्याच्या पायां पडतो,)

रवळोजीराव—(त्याला लाथ मारून) जा, जा, लवकर तोंड काळं कर. [गुलाबराव जातो, तो गेलासें पाहून रवळोजीराव हकीमसाहेबाजवळ येऊन] या प्रकाराबद्दल बाहेर एक अक्षरही फोडूं नका. वास्तवीक ह्मटलं ह्मणजे यांत माझाच दोष आहे. हें तुह्मांला ठाऊकच आहे कीं, माझ्यापासून इला सुख नसल्यामुळं असं घडलं ! अरेरे ! किती शरमेची व अपमानाची ही गोष्ट आहे. (बायकोकडे पहात) पण इच्या जिवाला धोका नाहींना ?

हकीमसाहेब—फारसा नाहीं. थोड्याच वेळांत सावध होतील या,—

रवळोजीराव—(दुःखानं) हाय हाय ! जिथं जिथं माझं व्यंग नडत आहे. हकीमसाहेब याला कांहींतरी औषध द्या.

हकीमसाहेब—(मान हलवीत) अंहं ! आपलं नपुंसकत्व जन्माचं असल्यामुळं त्यावर बिलकुल औषध नाहीं. (लावण्यलतिका सावध होते) या पहा, सावध झाल्याच.

रवळोजीराव—(तिची समजूत करीत) अग तुझ्याकडं कांहीं नाहीं मींच सर्वस्वी दोषी आहे. मीच जर लग्न केलं नसतं तर तूं तरी असं कां केलं असतंस. अरेरे ! कोण माझ्यावर दुर्धर प्रसंग हा ! (पडदा पडतो)

अंक ४ था.

प्रवेश ५ वा.

स्थळ–विलासदुर्ग राजवाड्यांतील राजपुत्राचा महाल.
वेळ–रात्र.

राजपुत्र व गुलाबराव बोलत उभे असतां पडदा उघडतो.

राजपुत्र–काय काय ? पुरूषसंगही ठाऊक नव्हता अशी ? लग्न झालें असूनही असा प्रकार ? काय तिचं नांव ? ती माझ्या ओळखीची आहे कां ?

गुलाबराव–सरकार, आहेत त्या आपल्या ओळखीच्या. आणि आपण हुकूमच करीत आहां; तेव्हां माझा इलाज नाहीं. ह्मणून सांगतों, त्या बाईसाहेब, दुसऱ्या कोणीही नसून, सरदार रवळोजीरावांचं कुटुंब लावण्यलतिका याच आहेत.

राजपुत्र–काय, लावण्यलतिका ! रवळोजीरावाची बायको ? ती शुद्धपणाचा नखरा मिरवणारी कठोर आणि क्रूर लावण्यलतिका ?

गुलाबराव–सरकार, मी सांगितलेली गोष्ट अक्षरशः खरी.

राजपुत्र–च्छे ! तुह्मीं मला अतोनात चमत्कारिक गोष्ट सांगितलीत ही ! तुह्मीं मला चकित करून टाकलंत पण हो, समजलें. मीं, तें जोडपं एकमेकांशीं असें कां वागतं तें नवरा बायको एका खोलींत कां निजत नाहींत हीही गोष्ट आली माझ्या लक्षांत. तो सरदार नपुंसक असावा. ह्मणून ती तुमच्यावर फिदा होऊन तुमच्याशीं लागू झाली.

गुलाबराव—असं तर खरं ! .

राजपुत्र—तिच्या विरुद्ध कांहीं कामगिरी करावी लागली, तर ती करायला तुह्मीं तयार झालं पाहिजे.

गुलाबराव—मोठ्या आनंदानं करीन—मागंही आपल्या करतां, त्या तुमच्या गुप्त लग्नाच्या बायकोचा खून मींच केला व त्याकामीं फांशीं सुद्धां गेलों, पण तुह्मीं कांहीं मला वांचवायचा प्रयत्न केला नाहींत हें आपल्या-सारख्याला शोभत नाहीं.

राजपुत्र—तुला वांचवायचा मी पुष्कळ उद्योग केला. पण बाबापुढं कांहीं इलाज चालेना ह्मणून तसं झालं. पण आतां मात्र मी तुला त्या आमच्या थेरड्या बाबांकडून माफीचा दाखला आजच्या आज देविवतों, मग तर झालं पण माझ्या कामगिऱ्या मात्र तूं फत्ते केल्या पाहिजेत.

गुलाबराव—माझं काम झालं, कीं आपण मनांत आणलेल्या गोष्टी घडल्याच ह्मणून समजा.

राजपुत्र—ऐका तर—त्या लावण्यलतिकेवर माझं मन फारच बसलं असून, ती माझा द्वेष करते. मागं एकदां ती माझ्या अगदीं हातांत यायच्या रंगांत होती. पण कांहीं अडचणीमुळं तो योग घडला नांहीं. ती माझा तिरस्कार करते, ह्मणून, तिचा सूड उगवून स्वतःची कामवासना तृप्त करावी असा माझा हेतू आहे. हा बेत तुह्मीं शेवटाला नेला पाहिजेत.

गुलाबराव—मी पूर्वींपासून सरकारचा बंदा आहे. तेव्हां हा आपला बेत मी ताबडतोब फत्ते करणारच.

राजपुत्र—ठीक आहे, जा तूं आतां मी तुला फांशी-पासून माफी दिल्याबद्दलचा दाखला बाबांकडून आणून देववीन. कांहीं काळजी करूं नको. पण माझं काम फत्ते कर.

गुलाबराव—तें माझ्याकडं लागलं! (जातो.)

राजपुत्र—(आत्मगत) हं! लावण्यलतिके, तूं फार हट्टी आहेस नाहीं? माझा अव्हेर केलास अं! पण मी या गोष्टीबद्दल सूड उगिवणार! मी तुझ्याशीं विलास करून,—आपलं समाधान करून घेतल्यावर,—या फांशीं गेलेल्या गुलाबरावाशीं तुझा संग घडला,—असं तुला टोंचून बोलून,—तुझा तिरस्कार करीन. आणि अशा रीतीनं आपला सूड उगवीन. अहाहा! किती बहार होईल मग! वाः! एकून लावण्यलतिका आज मला सांपडणार! केवढी बहार ही! पण ती आमची सुंदर मैत्रीण अजून कां बरं नाहीं आली?

राधाबाई—(एकदम येऊन राजपुत्राच्या गळ्याला मीठी मारून) ही हजरच आहे.

राजपुत्र—अरे वाः! अगदीं वेळेवर आलीस. पण त्या लीलेकडच्या कामाचं काय झालं? पटायचं कांहीं चिन्ह आहे कां? अलीकड लीला त्या सरदार गंभीररावाची बायको झाल्यापासून फारच मारू दिसूं लागली आहे. व कसंही करून तिला एकदां अंगाखालीं घालायचा माझा विचार आहे, तर सरळ तऱ्हेनं तें जमण्यासारखं आहे कां?

राधाबाई—ती पोर तुह्मांला सरळ तऱ्हेनं वळायचं कांहीं चिन्ह दिसत नाहीं सतत तुमचं नांव काढलं कीं ती नाक मुरडते. तसंच तिची ती 'बहीण तुमच्याच पायांत वेडी होऊन वाटेल तें भकत असते. आणि तो मेला सरदार गंभीरराव अलीकड मलाहीं आपल्या घरीं येऊं देत नाहीं.

राजपुत्र—तर मग जबरदस्तीचाच कांहीं तरी उपाय योजणं प्राप्त आहे.

राधाबाई—आणि तो कसा योजायचा, हेंही मी आपल्या मनांत योजून ठेवलं आहे. सरकारची आज्ञा असेल तर त्या गंभीररावाला व त्या वेड्या कमलेला,—दुसरीचकड गुंतवून—लीलेला तुमच्या हातांत आणून देतें. पहा तर खरी मजा.

राजपुत्र—(तिचा मुका घेऊन) असं जर होईल,—तर तुला नखशिखांत रत्नांनं मढवून काढीन,—ती भुवनसुंदरी लिला, मला कशी मिळेल असा सारखा ध्यास लागला आहे. खातां, पितां, उठतां, बसतां, रात्रंदिवस तिचं मला वेड लागलं आहे. कसंही करून ती मला मिळेलसं कर.

राधाबाई—कांहीं तरी भयंकर युक्ती योजून तिला मी कचाट्यांत धरतें.

राजपुत्र—(तिला मिठी मारून) तसं करच. पण आज तूं फारच खुललेली दिसतेस. तेव्हां या घटकेला तुझ्यांशींच मजा मारावीसं मला वाटतं.

राधाबाई—(त्याला मिठी मारून) मग माझ्याकडून तरी

कुठं ना आहे. चला तर. (दोघेही जातात. व पुष्पवती राजकन्या व राजा, प्रवेश करतात.)

पुष्पवती–मामंजी, आपण ऐकलंतना त्यांचे बेत कसे चालले होते ते ? व शेवटीं त्यांनीं कसं घाणेरडं कृत्य केलं, तेंही पाहिलंतच !

राजा–याचं अजूनही असं वर्तन पाहून अंगाची आग होते ! आग ! ! आतां त्याला कडक शिक्षा दिलीच पाहिजे. क्षमा करायची वेळ गेली.

पुष्पवती– (हात जोडून पायां पडून) मामंजी, मला चुडेदान देण्याकरतांच आपण त्यांनां त्रास देऊं नये, अशी माझी आपल्या पायांजवळ विनंती आहे.

राजा–सुनबाई, तें खरं, पण—त्याचा त्या फांशीच्या गुन्हेगाराशीं अजूनही स्नेह आहेच,—व त्याची काळीं कृत्यं अजूनही चालू आहेतच,–बस्स,–याचा न्याय झालाच पाहिजे–त्याला कडक शिक्षा देतों. (मुठी रागानें वळतो.)

पुष्पवती–मला चुडेदान द्यायचं असेल तर असं करूं नका.

राजा–ऊठ तूं, मी त्याची खोड मोडणारच.

[जातात पडदा पडतो.]

अंक ४ था.

प्रवेश ६ वा.

स्थळ–सरदार रवळोजीरावाच्या घरांतील खोली.

वेळ–रात्र.

लावण्यलतिका पलंगावर निद्रिस्थ असतां–छपत छपत गुलाबराव व राजपुत्र प्रवेश करतात पडदा उघडतो.

गुलाबराव–(लावण्यलतिकेकडे बोट करून) ही पहा सर–

कार आपली शिकार ! आतां इचा वाटेल तसा बहार भोगून घ्या.

राजपुत्र—तूं बाहेरच उभा ऐस बरं कां ?

गुलाबराव—अगदीं नजीकच आहेसं समजा. (जातो.)

राजपुत्र-(लावण्यलतिकेकडे पहात) अहाहा ! विधात्या, धन्य आहे तुझी ! असली मोहक मूर्ती एकांतांत दिसल्यावर मनाची चलबिचल उडून जाऊन कसल्याही निश्चयाचा मनुष्य ब्रह्मचर्यापासून भ्रष्ट होईल. असो आतां इला आपलीशी करावी. (तिच्या पलंगाजवळ भीत भीत जाऊन अंगावर हात टाकतो. ती एकदम जागी होऊन भयानें पलंगावरून उडी टाकून उभी राहाते) भिऊं नको, मीच आहे.

लावण्यलतिका—हा ! मागं सरा, माझ्याशीं दगलबाजी झाली आहे. कांहींतरी विश्वासघात झाला आहे. असा खोटेपणा करणं तुमच्या सारख्यांनां शोभत नाहीं. (ओरडून) अहो, कुणी तरी धांवा ! हो धांवा ! !

राजपुत्र—सुंदरी, अशी घाबरून हांका मारीत सुटूं नकोस आपलं मन स्थीर कर. तुझ्यावर आपला सूड उगवावा ह्मणून आज कित्येक दिवस मी टपून बसलों होतों, ती वेळ आज आली. आज मी आपला सूडही उगवीन. आणि स्ततःचा मदनही शांत करीन. एक शब्द मी बोललों कीं तुला मान खालीं घालावी लागेल—आणि थोड्याच अवकाशांत तूंच होऊन मला गाढालिंगन देशील.

लावण्यलतिका—अंहं ! नाहीं. ही गोष्ट कधीं नाहीं होणार (इकड तिकड पळत जाऊं लागते, राजपुत्र जोरानें तिला धरतो.)

राजपुत्र—अग गर्विष्ठे, आतां तर फसले तुझे सारे बेत गेली वांया तुझी खटपट ! आणि बिघडला तुझा बंदोबस्त ! आतां कुठं जाशील तूं ? आतां कठोर शब्द बोलून तुझी मानखंडणा मी निःशंक केलीच पाहिजे. अग सटवे, मांगानं फांशीं दिलं असतांही जो वांचला, त्याच्याशीं लागू होणाऱ्या त्याच्या आवडते, हा घे माझा सलाम !

लावण्यलतिका—(दुःखानें) अरेरे ! देवा ! तेवढं मात्र माझ्याकडून पातक घडलं खरं ! (रडूं लागेत.)

राजपुत्र—हं, आतां इतकं दुःख कां वाटूं देतीस ? आणि एवढी तळमळ कां ? व माझ्यापुढं इतका शुद्धपणाचा नखरा तरी कशाला ? ज्याच्या गळ्या भोंवतालच्या फांसाचा वणही अजून बुजला नसेल, त्याला मिठ्या मारून त्याच्याशीं विलास करतांना, जी; लाजली नाहीं, तिनं आतां कां लाजावं ? हेंच कां तुझं पातिव्रत्य !

लावण्यलतिका—(तिरस्कारनं त्याकड पहात.) एकूण हें विश्वासघाताचं काळं कृत्य, त्या बेरडानं केलं ना ? तुह्मांला मी वश व्हावं असंच ना तुमचं ह्मणणं ?

राजपुत्र—हो, ह्मणजे सारा तंटा मिटला—(तिचें जुलमाने चुंबन घेतो. ती रागानें त्याला झिडकारते.)

लावण्यलतिका—चला दूर व्हा, मी तुह्मांला कधींही वश होणार नाहीं. प्राण गेला तरी ही गोष्ट होणार नाहीं.

राजपुत्र—(तिला जुलमानें धरून ती धडपडत असतां) बस्स, आतां कांहींही होऊं दे. मी करणार तुला आपलीशी.

लावण्यलतिका—आगबाई, मग मी आतां तुह्मांला कबूलच झालं पाहिजेना ?

(इतक्यांत सरदार रवळोजीराव दोन्ही हातांत दोन भरलेली पिस्तुलें घेऊन येतात. राजपुत्र भिऊन तिला सोडतो.)

रवळोजीराव-अग आतां वाटेल त्याला कबूल हो तुझ्याशीं लग्न लावून मी तुझ्या जन्माचं मातेरं केलं आहे तेव्हां तूं असंच करणं वाजवी ! अरे राजपुत्रा, तुझ्या सारखा कामांध पशू कुणीही नसेल-या अन्यायाची फळं तुला लवकरच मिळतील-आतां मी जगण्यांत कांहींच हांशील राहिलं नाहीं-तेव्हां मरावं हेंच उत्तम-(पिस्तुल मारून घेऊन मरतो, राजपुत्र भीतीनें इकड तिकड पहातो-लावण्यलतिका आपल्या नवऱ्याच्या हातांतील पिस्तूल काढून घेते.)

लावण्यलतिका-मांगा आतां पुढं सरक कीं मेलासच (राजपुत्रावर पिस्तूल रोंखते.)

राजपुत्र-(पळून जात असतां) आतां इथं घटकाभरही राहून सोय नाहीं. (जातो.)

गुलाबराव-(प्रवेश करून) कां, महाराज,-(दचकून तेथील प्रकार पहात आश्चर्यात थक्क होतो लावण्यलतिका भरलेलें पिस्तुल त्याच्यावर रोंखून)

लावण्यलतिका-मेल्या बरा सांपडलास ! तूंच माझ्या जन्माचं वाटोळं केलं आहेस, तर भोंग त्याचं प्रायश्चित्त ! (ती पिस्तुल त्याच्यावर झाडते, तो जखमी होऊन पडतो.) हाय ! हाय ! देवा ! किती तरी मी चांडाळीण ! असली मी कपाळ करंटी,-अभागी, जन्माला तरी कशाला आलें ? आतां पुढचे धिंडवडे पहाण्यापेक्षां लवकर मेलेलं बरं, आई जगदंबे, माझ्या सर्व कृतापराधांची क्षमा कर. (पिस्तुल स्वतःवर उडवून घेऊन मरते.)

गुलाबराव–(कण्हत कण्हत) अरेरे ! गोळी अगदीं वर्मी बसली आतां मात्र मी मरणार खास ! हाय हाय ! मी अधम खरा, माझा असाच शेवट होणं वाजवी. (उचकी लागून प्राण जातो. इतक्यांत अधिकारी, व शिपाई दारें फोडून आंत येतात.)

अधिकारी–अरेरे ! इथं तर रक्ताचा सडा झाला आहे. (गुलाबरावाकडे पाहून) अरे हा फांशींतून वांचलेला गुलाबराव, इथं मढ होऊन पडला आहे. हें दुसरं कोण ? सरदार खळोजीराव, व हें त्यांचंच कुटुंब ! बस्स या खुनांची वर्दी राजेसाहेबांनां दिलीच पाहिजे; मर्दहो ! उचला हीं प्रेतं !

[पडदा पडतो.]

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

——:o:——

स्थळ–विलासपुर नगरांतील राधाबाईचे घरांतील खोली.

वेळ–रात्र.

पलंगावर लीलावती, पडली असून तिच्या नाकाजवळ बेशुद्ध होणारें औषधाची कुपी धेऊन राधाबाई बसली आहे. चिमणी, सगुणी, बया, या तिघी मुलीं पैकीं दोघींनीं लीलावतीला दाबून धरलें आहे व एक पहारा करीत आहे असें असतां पडदा उघडतो.

राधाबाई–गप्प, पोरींनों अगदीं मुद्दां गडबड होऊं देऊं नका जरा गडबड झाली तर घात होईल. आतां मी

इला सावध करतें अं! (लीलावतीचे नाका जवळील कुपी काढते ती हळू हळू सावध होते व उठून बसते.)

लीलावती–(दचकून आस पास पहाते) अगबाई ? मी कुठं आहे ? माझी गरीब बिचारी वेडी बहीण इथं कां दिसत नाहीं ? आणि माझे प्रिय प्राणनाथ कुणी-कड गेले ?

राधाबाई–(तिच्या तोंडावरून हात फिरवून) मुली, भिऊं नको. तुझ्या घरचीं सगळीं माणसं खुशाल आहेत बरं!

लीलावती–(शंकेनें पाहत) पण तुह्मीं कोण ?

राधाबाई–अगबाई, मला नाहीं का तूं ओळखलंस ? मी राधाबाई !

लीलावती–बोला, तुह्मीं मला इथं कां आणलंत ? सांगा लवकर.

राधाबाई–(पडद्याकडे पाहून) हे राजपुत्र तुला याचं उत्तर देतील चलाग पोरींनों चला लवकर–(राधाबाई, चिमणी, सगुणी, बया, जातात.)

(उत्तम पोषाखानें नटून राजपुत्र येतो. व लीलावती जाऊं लागत असतां तिला अडवितो.)

राजपुत्र–हें बघ सुंदरी, तूं मला क्षमा कर. मी दगा करून,–फसवून तुला इथं आणलं आहे. तर एकदां माझी कामनां तृप्त कर व मग वाटेल तिकड जा. तूं तर गंधर्व-लोकच्या परीप्रमाणं सुंदर आहेस. व मीही कांहीं कमी देखणा नाहीं.

लीलावती–(त्याला झिडकारून) तुह्मीं अगदींच पाजी

सात पाजी,–हलकट आहांत. माझ्या भोळ्या बहिणीशीं पाजीपणा करून तिचा सर्वस्वी घात केला असूनही माझ्या सारख्या नांदत्या बायकोवरही हात टाकायला तयार झाल्यां आहां काय! धिक्कार असो तुमच्या अधमपणाला!

राजपुत्र–हें पहा, कमलेवर माझं मन जडून जे प्रकार झाले, ते कामातुराच्या हातून नेहमीं घडणाऱ्या चेष्टां पैकींच होतें. त्यांत नवल वाटण्या सारखं कांहींच नाहीं. तरी मला त्याबद्दल फारच वाईट वाटतं.

लीलावती–हे जे तुमच्या तोंडांतून उद्गार बाहेर पडले आहेत, त्यावरूनच तुमचा स्वभाव किती निलाजरा व हलकट आहे याचा स्पष्ट बोध होतो.

राजपुत्र–पोरी, वाजवी मर्यादा सोडून हे तुझे शब्द निघताहेत ! तरी पण तुझ्यावर रागावावंसं माझ्या मनांत येत नाहीं उलट तुला जें जें बोलावसं वाटतं तें तें तूं खुशाल बोलून घे, म्हणजे पुढं आपलं दोघांच सूत जमायला हरकत राहणार नाहीं.

लीलावती–अरेरे ! पुरुषांच्या दुष्टपणामुळं आणि बायकांच्या अधीरतेमुळं वांकडी पावलं पडण्याचे जे शेंकडो प्रकार घडतात, त्यांतीलच माझ्या बहिणीचा एक प्रकार आहे, असं अत्तां आपण म्हणालांत. पण त्या तिच्या बाबतींत तरी तुमच्याकडून जो गळा कापण्यांत आला, त्यांत आणि सैतानाच्या करण्यांत फारसं अंतर नाहीं. त्या माझ्या गरीब बिचाऱ्या बहिणीचा तुम्हीं गळा कापून विश्वासघात केला आहे, त्याबद्दल तुम्हांला यम-

यातना भोगाव्या लागतील. त्या बिचारीचं तुमच्यावर जें मन बसलं आहे, तें निव्वळ तुमच्यासाठींच. तुह्मीं राजपुत्र आहांत हें तिच्या स्वप्नींही नव्हतं. तुह्मी मदनरावच आहां, असं ती समजत होती. तुह्मीं पहिल्यानं आमच्य घरीं कसे आलां ? तिथं काय काय बहाणे सांगितलेत ? आणि पुढं तिला कसकशा थापा मारल्या ? तें सारं तुमच्या लक्षांत असेलच. तेव्हां माझ्या बहिणीनं जें निर्मल प्रेम तुमच्यावर ठेवलं, तें तुह्मीं फार दुष्टपणानं हिसकावून घेतलंत हो ! अघोर, राक्षसी, चौर्यकर्म तुह्मीं केलंत ! ! तिच्या पवित्र अंतःकरणाचा तुह्मीं सर्वस्वी घात केलात ! ! !

राजपुत्र–(पश्चात्ताप झाल्याचें सोंग करून) लीले तुझ्या बहिणीशीं माझं वर्तन फारच वाईट झालं हें मी कबूल करतों. पण मी तरी काय करूं ? माझं तिच्यावर अतोनात प्रेम बसलं, आणि त्या प्रेमाच्या सपाट्यांत मला कांहींच भान राहिलं नाहीं. मी वेडा बनलों होतों, त्या वेळेला ! सैतानानं जरी माझा प्राण मागितला असता तरी तोही द्यायला मी कबूल झालों असतों. तशा प्रीतीच्या सपाट्यांत माझ्या हातून तसं काम झालं, याला माझा काय उपाय ? मी जें केलं त्याचा प्रतिकार तुझ्या बहिणीशीं लग्न लावून माझ्यानं होत नाहीं. पण जाऊं देत त्या कंटाळवण्या गोष्टी ! तूं व मी आनंदानं विलास करून आपलं भांडण मिटवूं.

लीलावती–(तो जवळ येतो त्याला दूर लोटून) चला,

दूर व्हा. असल्या तुमच्या सोंगाला मी फसणार नाहीं. तुम्हीं नीच, कृतघ्न, दुष्ट काळसर्प आहांत.

राजपुत्र–(संतापानें) तोंड बंद कर! हें तुझें बे-जबाबी बोलणं आतां माझ्यानं ऐकून वेववत नाहीं.

लीलावती– (संतापानें इकडे तिकडे धांवत बाहेर जायला वाट पाहाते पण ती सांपडत नाहींसें पाहून) आई जगदंबे, तूंच मला या राक्षसापासून सोडीव–धांवा हो धांवा कुणी–

राजपुत्र– (आत्मगत तिच्याकडे पहात) अहाहा! ही अशी संतापली असतां किती तरी छानदार दिसते! आतां वेळ गमावण्यांत अर्थ नाहीं. स्वतःची कामवासना इच्यावर लवकर पुरी करून घ्यावी. (उघड) अग ए, आतां उभं किती वेळ राहायचं या पलंगावर बैस, ये, मी तुला बशिवतों. (तो तिला धरायला पुढं सरतो ती त्याला ढकलते.)

लीलावती–हां! मागं सरा. किती पाजीपणा हा! मला घरीं जायचं आहे, जाऊं देता कीं नाहीं? अतीशय निंद्य हलकटपणाचं,–व विश्वासघातचं काम करून तुम्हीं मला इथं आणवलं आहे. तर मला मुकाट्यानं जाऊं द्या, नाहीं तर खास खास मी जीव देईन.

राजपुत्र–तुझ्या समागमसुखाचा लाभ तूं दिल्या खेरीज मी तुला कधींही सोडणार नाहीं.

लीलावती–(रागानें) चांडाळा! हे शब्द तूं मला बोलतोस काय! जिचा सर्वस्वी घात करून,–जिचं शुद्धत्व हिरावून घेऊन,–अखेर जिला वेड लावलंस,–तिच्या बहिणीला,–मला असं बोलतोस काय? चल, नराधमा वाट सोड, मी तुला फसणार नाहीं.

राजपुत्र–मी तुला कधींही जाऊं देणार नाहीं. तूं शुद्धतेचा पातिव्रत्याचा व सद्‌गुणांचा मोठा ताठा मिरवीत आहेस पण हा तुझा हट्ट तूं सरळ वश न झालीस तर बलात्कार करून तेव्हांच जिरवीन. (अस्तन्या मागें सारीत) चल, मुकाट्यानं पलंगावर चल.

लीलावती–आतां तर तुम्ही अगदींच लाज सोडलीत! पण तुम्हीं माझ्याशीं दांडगाई करूं लागलांत, तर मी मरायलाही राजी होईन–मी मोठ मोठ्यानं किंकाळ्या फोडून सगळं शहर जागं करीन. व तुमच्याशीं झगडून अखेर स्वतःचा प्राण देईन. (इकडे तिकडे धांवत ओरडत फिरते.)

राजपुत्र–(हंसत) अग, इतका मी कच्चा आहेसं तूं समजूं नको! वाटेल तितकं आरड, अगर प्राण दे! पण तुझी दाद बाहेर न लागावी असा मी पूर्वीच बंदोबस्त करून ठेवला आहे.

लीलावती–(दुःखानें व निराशेनें) आई जगदंबे! माझा छळ करणाराचे सारे बेत शेवटास तूं नेणारच अं! माझ्या प्राणनाथांनां तूं सुखी राख! मी तर या अधमापुढं आपला जीव देणारच! (मोठ्यानें ओरडत) अहो धांवा हो धांवा कुणी या गरीब गाईची या कसाया पासून सुटका करा हो! याहो! या कुणी तरी.

राजपुत्र–(भयानें इकडं तिकडं पहात) च्छे! आतां मात्र हा गाढवपणा बंद केलाच पाहिजे! हें पहा, मी तुझं तोंडच बंद करतों. (लीलावतीला जुलमानें धरून ती धड-

पडत असतां पलंगाजवळ नेतो, इतक्यांत तेथें, सरदार गंभीररावानें येऊन राजपुत्राला जमीनीवर अडवा पाडणें व त्यांवर आपली तरवार उगारून)

गंभीरराव–अधमा, नीचा; विश्वासघातक्या आतां ही कठोर समशेर तुझ्या काळजांत भोसकून, यमपुरीला तुझी रवानगी करतों. चोरा, माझ्या स्त्रीवर हात टाकायला तुला शरम कशी नाहीं वाटली? (त्याला ठोंसे मारून) भोग भोग ! तुझ्या अनंत पातकांचं दुःख याच जगांत !

लीलावती–(राजपुत्राला लाथ मारून) मेल्या - तूं कुजून मेलास तरी कुणाला वाईट वाटणार नाहीं ! (गंभीररावाला मिठी मारून) प्रिया, आपण आलां ह्मणूनच या चांडाळाच्या हातून सुटलें. आई जगदंबे तुझे माझ्यावर शतशः उपकार आहेत. (कमलावती धांवत येते तिला मिठी मारून) अक्का मला कडकडून भेट.

कमलावती–पण हें मी काय पहातें आहें ! (राजपुत्राकडे बोट करून) यांची अशी स्थिती अखेर झाली अं !

लीलावती–अक्का, या मेल्यानं मला तुझ्या सारखंच फसवायचं मनांत आणलं होतं, पण मी बरी फसेन! यांनीं या चांडाळाला चांगला मऊ केला. मेल्या - रड आतां !

गंभीरराव–(राजपुत्रावर तलवार उगारून) अधमा ! अतांच तुला या खड्गाचं तीक्ष्ण पाणी दाखवितों हे नरपशू, आजपर्यंत, कैक बायका तूं भ्रष्ट केल्या आहेस, त्याबद्दल यथायोग्य सूड घ्यायची वेळ हीच आहे. तर घे देवाचं नांव, या एका घावानं तुझं डोकं चेंडूप्रमाणं उंच

उडिक्षतों. (तलवारीचा घाव घालणार, इतक्यांत कमलावती त्याचा हात धरते.)

कमलावती—अहो, माझ्या करतां ! फक्त माझ्या करतां! यांना प्राणदान द्या. कसंही झालं तरी ते माझे प्रियकर आहेत, असं मानतें मी. तेव्हां माझ्या करतां त्यांनां मारूं नका एवढी भिक्षा मला घालाच. (पदर पसरते.)

लीलावती—अक्काच्या संतोषा करतां त्याला सोडावं असं मी ह्मणतें.

गंभीरराव—(तलवार म्यानांत घालून) लाडके, तुझ्या शब्दावर व या कमलावतीबाईच्या ह्मणण्याला मान देऊन, याला मी ठार मारीत नाहीं; तरी याचा न्याय झालाच पाहिजे ह्मणून याला मी राजेसाहेबांकडं कैद करून नेणार. (राजपुत्राचे हात पांय काढणीनें बांधून टाकतो.)

कमलावती—(दुःखानें) अरेरे ! शेवटीं यांच्यावर असा प्रसंग येऊन तो मी पहायला जीवंत राहावं अं ! यापेक्षां मेलें असतें तरी बरं झालं असतं ! (रडू लागते लीलावती तिचे डोळे पुशीत)

लीलावती—अक्का, असं दुःख॰ करूं नको. उगीं ! असं काय बरं करावं ? तूं माझी बहीण ना ? (कमलावती दुःखानें राजपुत्राची स्थिती पाहून रडूं लागते. व लीलावती तिचे डोळे पुशीत सांत्वन करते.)

गंभीरराव—(पडद्याकडे पाहून) हां ! बरं झालं, ही राजेसाहेबांची स्वारी आलीच—(इतक्यांत—राजा—पुष्पवती राजकन्येसह येतो.—बरोबर सरदार रणधीरराव व शिपाई वगैरे असून

राधाबाई, चिमणी, सगुणी, बया, या चौघींस कैद करून आणतो.)
महाराज, मुजरा करतों. (मुजरा करून) या नीच-अधम आपल्या मुलानं—

राजा—सगळं मला समजलं आहे, तुह्मीं सांगूं नका हा माझा नीच कार्टा,—अतीशय दुष्ट निपजला आहे (त्याला लाथ मारून) गाढवा ! तूं पशू ! पाजी, नादान, नालायख आहेस. ह्मणूनच तुझी फट् फजीती होण्याकरतां—राजगुरूंच्या न्यायसभेंत तुझ्या घोर अपराधांची चौकशी करायचा मी बेत योजला आहे. तिथं तुला अतीशय कडक शिक्षा मिळेल अशी मी खटपट करीन.

पुष्पवती—(रडत) काय तरी मेला वाईट दिवस उगवला आहे हा ! जगदंबे ! या संकटांतून प्राणनाथांचं सर्वोपरी रक्षण करणारी तूंच आहेस. मला चुडेदान दे हेंच मागणं आहे.

रणधीरराव—अरे राजपुत्रा, तुझ्याकडून महान गुन्हा घडला आहे, तर महाराजांची पश्चात्तापपूर्वक क्षमा माग. तरच वांचशील. माझ्या दोन्हीं लाडक्या मुलींनों, या मला ह्मातान्याला भेटा. मी अहंपणानं लीले तुझा—तुझा धिक्कार केला होता पण त्याचं मला यावेळीं वाईट वाटतं. (कमलावती व लीलावती दोघीही त्याला भेटतात.)

लीलावती—बाबा, आह्मां दोघींनांहीं नेहमीं आपला अशिरवाद पाहिजे.

कमलावती—आपल्या अशिरवादानंच आमचं पुढं चांगलं होईल.

गंभीरराव–रणधीररावजी, आपला हा जांवई आज आपल्याला वंदन करीत आहे.

रणधीरराव–तुमचं चांगलं व्हावं असा माझा पूर्ण हेतू आहे.

राजा–आजचा हा प्रसंग पाहून माझा पूर्वीचा सगळा स्वभाव बदलला आहे. (राजपुत्राकडे पाहून) अरे काट्या, कितीरे तुझं मन निबरगट्ट पाषाणा सारखं आहे. अधमा तुला अजूनही पश्चात्ताप होत नाहीं ना ?

राजपुत्र–(पश्चात्तापानें नम्र होऊन) बाबा, खचीत मी महा पातकी, नराधम, हलकट मनुष्य आहें. या जगांत मी अधमपणानं दुसऱ्यांच्या बायका हरण करून यमराजाच्या नरककुंडांत जाण्यासारखीं घोर पातकं केलीं आहेत. अरेरे ! कितीरे मी दुष्ट ! कृतांता ! तूं आपली असह्य अशीं शस्त्रं या माझ्या छातींत खुपस ! व या देहाचा शेवट करून याचं मांस कावळ्यांनां खायला घाल यमदूत हो, तुह्मीं तापलेले लोहदंड माझ्या उरांत खुपसून मला भाजा ! व अत्यंत हाल हाल करून मला छळा ! अरेरे ! असा कसारे मी करंटा मुलगा निपजलों ! बाबा, मी राज्य करण्यालायख नाहीं–ह्मणून तुह्मीं दुसऱ्या कुणाला तरी गादीवर बसवा ! मी सर्वांगाला राख फासून निबिड जंगलांत जातों–प्राणप्रिये कमले. मी तुला फशिवलं आहे, याबद्दल क्षमा कर. आतां जर तूं या दुर्दैव्याचा अंगिकार करशील तर मी तुझ्याशीं लग्न लावून गरीबींत दिवस काढायला तयार आहे.

कमलावती–(राजपुत्राला मिठी मारून) प्रिया, असं

आपलं गोड भाषण माझ्या कानावर कधीं पडेल, असं मला झालं होतं.

राजपुत्र–तसंच, लीलावतीबाई–आपला मी महान अपराध केला आहे. याबद्दल मी पायां पडतों, एकदां क्षमा असं आपण ह्मटलं ह्मणजे माझा आत्मा शांत होईल. (पायां पडतो.)

लीलावती–क्षमा आहे बरं तुह्मांला.

राजपुत्र–सरदार गंभीररावजी, माझ्या हातून पाजीपणा झाला आहे खरा. आपल्या मनांत जर राग ठेवायचा असेल तर माझी मान अत्तांच छाटा, नाहीं तर मला क्षमा–क्षमा करा. मी दीन होऊन तुह्मांला शरण येत आहें.

गंभीरराव–खरोखर तुह्मांला पश्चात्ताप होईल तर मी क्षमा करीन.

राजपुत्र–(पुष्पवती राजकन्येस) अग ! मी तुझ्याशीं लग्न लावलं असून फारच निष्टूरपणानं वागलों, याबद्दल तूं मला क्षमा कर.

पुष्पवती–(राजपुत्राजवळ जाऊन) प्रिया, आपण कां माझ्याजवळ क्षमा मागायची ? असं काय मेलं करावं ?

राजपुत्र–बाबा, आजपासून. मी आपलें सगळे दुर्गूण टाकून सन्मार्गानं चालेन अशी आपल्याच पायांची शपथ घेतों. पण एकदां या आपल्या हतभाग्य कारट्याला क्षमा करा.

राजा–चोरा, हरामखोरा, गप्प बैस तुला माझ्याकडून कधींही क्षमा मिळायची नाहीं तुझा न्याय राज-

गुरूसमोरच झाला पाहिजे. आणखीं त्यांत तुझा प्राण गेला तरी बेहेत्तर !

कमलावती–व पुष्पवती–(दोघी मिळून) मामंजी आमच्या सौभाग्याकडं लक्ष देऊन एवढी गोष्ट करूं नका.

राजा–मी कधींही ऐकणार नाहीं गंभीररावनी (राजपुत्राकडे हात करून) या दुष्टाला मोठ मोठ्या बेड्या ठोकून कडक पहाऱ्यांत ठेवा, कसूर करूं नका बरं. या नीचाचा असाच परिणाम झाला पाहिजे. (कमलावती, लीलावती, व पुष्पवती हें ऐकून रडूं लागतात) रण-धीररावजी, या राधाबाई कुंटिणीलाही कडक बंदोबस्तांत ठेवा. ही रांड तर फारच दुष्ट व घातुक आहे. इच्याही काळ्या कृत्यांची चवकशी होऊन इला शिक्षा ठोठावलीच पाहिजे. चला. चला आतां राजगुरू पुढं !

[पडदा पडतो.]

अंक ५ वा.

प्रवेश २ रा.

स्थळ–न्यायाधीश कचेरी.

मुख्य स्थानीं राजगुरू असून जवळ मंत्री बसले आहेत. राजा हात जोडून सिंहासना समोरे उभा आहे राजपुत्र, राधाबाई, चिमणी, सगुणी, बया, या कैदी लोकांना बांधून शिपाई उभे आहेत, दुसऱ्या बाजूला सचिंत असलेल्या कमलावती–लीलावती व पुष्पवती राजकन्या अशा तिन्ही उभ्या असून तेथेंच गंभीरराव व रणधीरराव वगैरे सरदार उभे आहेत असें असतां पडदा उघडतो.

राजगुरू–राजा, तुझ्या दुष्ट व पाजी मुलाच्या गुन्ह्याची

सगळी चौकशी झाली., यावरून हा निःसंशय अपराधी ठरतो पण याला कडक शिक्षा देऊं नये 'असंच' माझ्या बुद्धीला वाटतं—तरी हा तुझा दुष्ट,—भयंकर घोर कृत्य करणारा पुत्र इतःपर राज्य करायला लायख नाहीं—म्हणून याचा राज्यावरचा वारसा अजीबाद काढला आहे—तसंच यानं जन्मभर आपल्या आयुष्याचे दिवस एकांतवासांतच घालविले पाहिजेत, असा आमचा हुकूम आहे.

राजा—पण या अधमाला गुरूजींनीं देहांत शिक्षाच देणं योग्य आहे.

राजगुरू—तुझं म्हणणं जरी रास्त आहे, तरी या साध्वी पुष्पवती व कमलावतीच्या सौभाग्याकडं व सद्वर्तनाकडं लक्ष देऊनच आम्हीं याला जिवंत ठेवतों.

राजा—गुरूजींच्या इच्छे पुढं माझं कांहीं म्हणणं नाहीं.

राजपुत्र—(पश्चात्तापानें) महापूज्य गुरूजी, मी अतीशय नीचकर्मा असून आपण मला जिवंत कशाला ठेवतां ? या माझ्या सर्वांगाला पलीते लावून जाळायचा हुकूम कां देत नाहीं ? खचीतच मी पाजी,—गाढव,—पशू अधम आहें. आपल्या दयादृष्टीला मी बिलकुल पात्र नाहीं. म्हणून या चांडाळाच्या अपवित्र देहाला चौंहोंर करून विंचवांच्या नांग्या लावून रसातळाला पोंचवा ! माझी तिळा एवढाली खंडं करून ती कुत्र्यांना खायला घाला ! व माझ्या डोक्यावर घणांचे जबरदस्त आघात करून हें छिन्न भिन्न करून टाका. इतकं केलं तरी सुद्धां माझ्या अपराधांच्या मानानं कमीच सजा होणार आहे.

राजगुरू—आतां यापुढं तरी जिवंत राहून या तुझ्या दोन्ही बायकांनां सुख दे ह्मणजे तुला खरा पश्चात्ताप झाला असं मी समजन.

राजपुत्र—गुरुजींच्या आज्ञे प्रमाणं मी वर्तन करीन.

राजगुरू—बाई कमलावती व पुष्पवती तुम्हीं—या राज पुत्रासह दोघींही समाधानानं राहा.

कमलावती—आपली आज्ञा देवा प्रमाणं आह्मीं मानतों.

पुष्पवती—आमच्यावर दया दृष्टीनं गुरूजींनीं जी कृपा केली आहे, त्याबद्दल आह्मीं आमच्या कातड्यांचे जोडे करून आपल्या पायांत घातले तरीं आह्मीं उतराई होणार नाहीं.

राजगुरू—गंभीररावजी, तुह्मीं मोठ्या नेकीचे सरदार आहां ! ह्मणून तुह्मांला आह्मीं या राज्याचे मुख्य प्रधान नेमलें आहेत. या सद्गुणी लीलेसह तुह्मीं आनंदानं राहा.

गंभीरराव—गुरूजींचा हुकूम शिरसावंद्य आहे. या माझ्या प्रिय पत्नीला आपला पूर्ण अशिर्वाद असावा.

लीलावती—(नमस्कार करून) या अभागीवर आपलं कृपाछत्र आसावं हेंच मागणं आहे.

राजगुरू—(वर हात करून) अशिर्वाद, तुह्मां दोघांचंही परमात्मा चांगलं प्रेम ठेवील. असो. आतां या दुष्ट निर्लज्य कुंटिणीच्या काळ्या घोर भयंकर कृत्यांबद्दल इला शासन देणं रास्त आहे, असली उलट्या काळजाची स्त्री जन्म-माजांत विरळा ! ही कृत्या वाटेल तसले अधम पणाचे अपराध करणारी आहे ! देवाधीदेवा, तूं असल्या चांडा-

ळणींनां या जगांत जन्मालाच घालूं नको, असं माझं तुझ्यां-जवळ हात जोडून मागणं आहे. असल्या करंट्यां स्त्रिया जर पैदा होतील तर जगाची जळून राख होईल. अशांनां जगूं देतां उपयोग नाहीं, पण काय करावं स्त्री हत्या करणं वाईट. रणधीररावजी !

रणधीरराव—(हात जोडून) काय आज्ञा !

राजगुरू—या राधाबाईला उलटी गाढवावर बसवून इची धिंड काढा. इचे पांच पाट काढून शहरभर अशी दौंडी पिटवा कीं, इच्या प्रमाणं अमंगल पणाचं आचरण जी करील तिलाही अशीच शिक्षा देण्यांत येईल. या तिन्ही निर्लज्य पोरीसह मी सांगितल्या हुकमा प्रमाणं करून आपल्या राज्याबाहेर या चौघींनाहीं ताबडतोब हद्दपार करा.

रणधीरराव—जसा हुकूम !

[जातात पडदा पडतो.]

समाप्त.